PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 5, ISSUE 4

# माध्यमिक स्तरावरील विद्यार्थांच्या लिंगविषयक सकारात्मक अभिवृत्ती विकसन उपक्रमांची परिणामकारकता

**विद्या वामन शिर्के**
शिक्षिका माध्यमिक स्तर
जिल्हा परिषद शाळा ठाणे
**महाराष्ट्र भारत**

**डॉ. जयश्री शिंदे**
शैक्षणिक तंत्रज्ञान विभाग,
एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई
**महाराष्ट्र भारत**

## गोषवारा

लिंगविषयक अभिवृत्ती या कशाप्रकारे तयार होतात व स्त्री व पुरूष या दोहोंच्या जीवनावर कशाप्रकारे परिणाम करतात, हे तपासता येते. महिलांविषयीच्या लिंगविषयक नकारात्मक दृष्टिकोनामुळे समाजातील असमानता व समाजाची अधोगती होतांना दिसते.

लिंगविषयक नकारात्मक अभिवृत्तीचा उगम कुटुंबात होताना दिसतो. आजही ही नकारात्मक अभिवृत्ती शालेय विद्यार्थ्यांच्या मनामध्ये आहे का? शालेय विद्यार्थ्यांच्या मनातील लिंगविषयक नकारात्मक अभिवृत्ती कमी करता येईल का? सकारात्मक अभिवृत्ती निर्माण करयासाठी शिक्षकांना काही उपक्रम राबविता येतील का? असे उपक्रम किती प्रमाणात परिणामकारक ठरतील या अनुषंगाने माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या लिंगविषयक सकारात्मक अभिवृत्ती विकसित करण्यासाठी उपक्रमांची निर्मिती करून त्यांची परिणामकारकता अभ्यासण्यात आली आहे

## प्रस्तावना :

अश्मयुगीन कालखंडापासुन मानवी इतिहासाचा प्रारंभ झालेला आढळतो. नवीन मानवाची निर्मिती केवळ स्त्रीच्या उदरातून होते असे तो मानत असे. स्त्रियांच्या या मातृत्वाच्या शक्तीचा आदर होतांना आढळतो. मातृप्रधान संस्कृतीमध्ये स्त्री व पुरूष हा भेद कोठेच आढळत नाही. परंतु कालांतराने नविन जीव जन्माला घालण्यात आपलाही सहभाग आहे, हे पुरूषाला समजले व आपले मूल कोणते हे समजावे या साठी विवाह ही संकल्पना पुढे

आली असे दिसते. विवाहामुळे स्त्रियांवर अनेक बंधने आलेली दिसतात. तिला स्वातंत्र्य नाकारले गेले. पुरूष हा श्रेष्ठ आहे व स्त्री कनिष्ठ आहे दुय्यम आहे हा विचार स्त्री व पुरूषांच्या मनावर बिंबवला जाऊन लिंगाधारीत भेदावर आधारीत लिंगाधारीत भूमिका ठरवल्या गेल्या व त्या लिंगभेदाधारीत भूमिकेवरून लिंगविषयक अभिवृत्ती ठरत गेलेल्या आढळतात. म्हणजेच लिंगविषयक अभिवृत्तीचा लिंगभेद हा पाया असल्याचे आढळत समाजसुधारकांना काही प्रमाणात यश आले. काही प्रथा बंद झाल्या. परंतु स्त्रियांचे समाजातील दुय्यम स्थान मात्र तसेच राहिलेले आढळते. म्हणूनच सद्यस्थितीतील लिंगविषयक अभिवृत्तीचा अभ्यास करणे गरजेचे आहे. **सकारात्मक** लिंगविषयक अभिवृत्ती**साठी प्रयत्न करणे** गरजेचे आहे

## भारतातील विविध बाबींतील सद्यस्थितीतील लिंगविषयक अभिवृत्ती

> *''बालसंगोपन व गृहसंगोपन हे कार्य सर्वस्वी वेगवेगळे संस्कार रूजविणे, साहित्यामध्ये स्त्री पुरूषांच्या साचेबध्द प्रतिमा रंगविणे, नोकरीमध्ये, व्यवसायामध्ये स्त्री पुरूषांना भिन्न संधी असणे, मुलीचा जन्मच नाकारणे, तिचे स्वातंत्र्य नाकारणे, तिचे अधिकार नाकारणे यातून लिंगविषयक दृष्टिकोन स्पष्ट होतो.''* ( सामंत, २००९)

स्त्री व पुरूष यांच्यामध्ये लिंगभेद होत असल्याचे आढळते. लिंगभेदासाठी असणाऱ्या लिंगविषयक अभिवृत्ती या आकृती क्र.१ मध्ये स्पष्ट केल्या आहे

**पालनपोषण**

- जन्माआधी व जन्मानंतर
- आहार, पोशाख, खेळणी
- प्रत्यक्ष आचरण
- आरोग्य

**काम व हक्क**

कामाची संधी, कामाचे स्वरूप

कामाचे ठिकाण, वेतन

वारसा हक्क, मालकी हक्क

**लिंग विषयक**

**शिक्षण**

शिक्षणाची संधी, शिक्षणाची स्वरूप, शिक्षणाचे ठिकाण, दर्जा, आर्थिक बाब,

| स्वातंत्र्य | अभिवृत्ती | ध्ववाह |
|---|---|---|
| निर्णय, आहार, विहार, मैत्री, प्रेम, विवाह, आर्थिक व्यवहार, लैंगिक स्वातंत्र्य | | नाते संबंध, हिंसाचार, जबाबदाऱ्या, पूनर्विवाह, घटस्फोट, व्यक्तिमत्व बदल, |

**आकृती क्र.१**

**भारतातील लिंगविषयक अभिवृत्तीचे स्वरूप**

वरील आकृतीद्वारे भारतातील लिंगविषयक अभिवृत्तीचे सद्यस्थितीतील स्वरूप स्पष्ट होते.

स्त्री दुर्लक्षित व दुय्यमस्थानी राहण्यामागचे खरे कारण लिंग संकल्पनाच आहे. लिंग संकल्पनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन समजणे व विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी उपक्रम तयार करून त्या उपक्रमांची परिणामकारकता जाणणे संशोधिकेस गरजेचे वाटते.

माध्यमिक स्तरावरील मुले—मुली हे कुमारावस्थेतील असून प्रौढावस्थेकडे जाणारे असतात. हयाच काळात त्यांचे व्यक्तिमत्व आकार घेत असते. आंतरिक भावना, विचार, लिंगविषयक विचार, सांस्कृतिक मूल्ये आकार घेत असतात. याच काळात स्वशरीर जाणीवजागृती होत असते. याच वयात होणारे मूल्यसंस्कार भावी आयुष्यात जपले जातात. हयाच काळात मूल्य निश्चित होत असतात आणि म्हणुनच योग्य वळण लावणे, योग्य संस्कार करणे गरजेचे असते. लिंगविषयक सकारात्मक अभिवृत्ती निर्माण करण्यासाठी उपक्रमाचे आयोजन करून त्यांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे महत्वाचे आहे.

## संशोधन समस्या विधान:

सदर संशोधन समस्येचे विधान खालील प्रमाणे निश्चित आहे:

माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या लिंगविषयक सकारात्मक अभिवृत्ती विकसन उपक्रमांची परिणामकारकता

## कार्यात्मक व्याख्या:

संशोधिकेने सदर संशोधनासाठी पुढील कार्यात्मक व्याख्या निश्चित केल्या आहेत.

- **माध्यमिक स्तर:** महाराष्ट्र शासन निर्धारित इ.९वी व इ.१०वी च्या वर्गांना माध्यमिक स्तर म्हटलेले आहे.
- **माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी:** माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी म्हणजेच इ.९वी व इ.१०वी मध्ये शिकणारे मुलगे व मुली होत.
- **लिंगविषयक अभिवृत्ती:** कोणत्याही व्यक्तीची कुटुंबातील व समाजातील स्त्रीविषयी; तिच्या शैक्षणिक, कौटुंबिक व सामाजिक स्थानाविषयीची भूमिका म्हणजे लिंगविषयक अभिवृत्ती होय. संशोधनामध्ये पुढील घटकातील लिंगविषयक अभिवृत्तीचा अभ्यास करण्यात आला. अ) पालनपोषण ब) शिक्षण क) विवाह ड) स्वातंत्र्य
- **सकारात्मक अभिवृत्ती :** स्त्री पुरूष समानता असावी असे मानणारी अभिवृत्ती म्हणजेच सकारात्मक अभिवृत्ती असे मानले आहे.
- **नकारात्मक अभिवृत्ती :** स्त्री पुरूष समानता नसावी. पुरूषांना स्त्रीपेक्षा श्रेष्ठ व स्त्रियांना पुरूषांपेक्षा कमी असे मानणारी अभिवृत्ती म्हणजेच नकारात्मक अभिवृत्ती होय.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१ माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या एकत्रितपणे लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे.

२ माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली याच्या एकत्रितपणे लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमांच्या परिणामकारकतेचा पुढील घटकांच्या संदर्भात अभ्यास करणे.
अ) पालनपोषण आ)शिक्षण इ)विवाह इ)स्वातंत्र्य

३ माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमांच्या परिणामकारकतेची पुढील घटकांच्या संदर्भात तुलना करणे.
अ) पालनपोषण आ)शिक्षण इ)विवाह इ)स्वातंत्र्य

४ माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमांच्या परिणामकारकतेची तुलना करणे.

**संशोधनाची परिकल्पना:**

१ माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या एकत्रितपणे लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमापूर्व व सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमानंतर लक्षणीय फरक आढळत नाही.

२ माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या एकत्रितपणे लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमापूर्व व सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमानंतर पुढील घटकांच्या संदर्भात लक्षणीय फरक आढळत नाही.
अ) पालनपोषण आ)शिक्षण इ)विवाह इ)स्वातंत्र्य

३ माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमाच्यानंतर पुढील घटकासंदर्भात लक्षणीय फरक आढळत नाही.
अ) पालनपोषण आ)शिक्षण इ)विवाह इ)स्वातंत्र्य

४ माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमाच्यानंतर लक्षणीय फरक आढळत नाही.

सदर संशोधन ठाणे जिल्हयातील कल्याण शहरापुरते मर्यादित आहे. सदर संशोधनामध्ये महाराष्ट्र बोर्डाच्या मराठी माध्यमाच्या शाळांचाच समावेश करण्यात आला. इंग्रजी माध्यम, गुजराती माध्यम, यासारख्या इतर माध्यमांच्या शाळांचा समावेश केलेला नाही.

लिंगविषयक सकारात्मक अभिवृत्ती निर्माण करण्यासाठी विकसित केलेल्या उपक्रमांची परिणामकारकता केवळ पालनपोषण, शिक्षण, विवाह, स्वातंत्र्य, या घटकासंदर्भातच अभ्यासली गेली.

संशोधना करीता प्रायोगिक पध्दती मधील एकलगट पूर्वोत्तर चाचणी ही पध्दती वापरण्यात आली. या पध्दतीद्वारे लिंगविषयक सकारात्मक अभिवृत्तीच्या विकासाकरीता तयार केलेलया उपक्रमांची परिणामकारकता व विद्यार्थ्यांच्या लिंगविषयक सकारात्मक अभिवृत्तीचा अभ्यास करण्यात आला.

**संशोधन नमुना निवडः**

प्रायोगिक पध्दतीकरीता नमुना निवड दोन पायऱ्यामध्ये करण्यात आली. क) पहिली पायरी—शाळा निवड, ख) दुसरी पायरी—विद्यार्थी निवड.

प्रायोगिक पध्दती करीता शाळा निवडः

क) सि.आर.सी अंतर्गत असलेल्या दोन शाळांची निवड सुगम यादृच्छिक रित्या करण्यात आली.

ख) विद्यार्थी नमुना निवड: वरील निवड केलेल्या शाळांमधील सर्वात अधिक लिंगविषयक नकारात्मक अभिवृत्ती असलेल्या १००विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये मुलगे ५३ आणि मुली ४७ निवडण्यात आल्या.

संशोधनासाठी अभिवृत्तीशोधिका या साधनाचा वापर करण्यात आला

**माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन:**

१ **परिकल्पना:** माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या एकत्रितपणे लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमपूर्व व सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमानंतर लक्षणीय फरक आढळत नाही.

**सारणी क्र. १ माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या एकत्रितपणे लिंगविषयक अभिवृत्तीमधील उपक्रमपूर्व व सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमाच्या नंतर फरकाच्या प्राप्तांकाची लक्षणीयता**

| अ. क्र. | विद्यार्थी गट | नमूना | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | 'टी' सारणी मूल्य | | प्राप्त टी | सार्थकता | लक्षणीयता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ०.०५ | ०.०१ | | | |
| | (उपक्रमपूर्व) मुलगे व मुली | १०० | ११७.३९ | ६.०८ | १९८ | १.९७ | २.६० | २५.३८४ | ०.०१ स्तरापेक्षा जास्त | ०.०१ स्तरावर लक्षणीयता आहे |
| | (उपक्रमोत्तर) मुलगे व मुली | १०० | १५७ | १४.०१ | | | | | | |

माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्याएकत्रितपणे लिंगविषयक सकारात्मक अभिवृत्तीच्या प्राप्तांकाच 'टी' मूल्य २५.३८४ हे ०.०१ स्तरावरील सारणीमूल्यापेक्षा अधिक

आहे. म्हणजेच मुलगे व मुली यांच्या सकारात्मक अभिवृत्तीमध्ये उपक्रमोत्तर लक्षणीय फरक आढळतो.

**निष्कर्ष:** मुलग्यांच्या व मुलींच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमपूर्व व उपक्रम नंतर फरक आढळतो. मुलग्यांच्या व मुलींच्या लिंगविषयक अभिवृत्ती उपक्रमानंतर सकारात्मक झालेल्या आढळतात.

२ **परिकल्पना:** माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या एकत्रितपणे लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमापूर्वी व सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमाच्यानंतर पुढील घटकांच्या संदर्भात लक्षणीय फरक नाही.
अ) पालनपोषण, आ) शिक्षण, इ) विवाह, इ) स्वातंत्र्य,

**सारणी क्र.२** माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली याच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये सकारात्मक अभिवृत्ती विकसन उपक्रमपूर्व व उपक्रमानंतरच्या पुढील घटकासंदर्भातील फरकाच्या प्राप्तांकांची लक्षणीयता

| अ. क्र. | विद्यार्थी गट | नमूना | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | 'टी' सारणी मूल्य | | प्राप्त टी | सार्थकता | लक्षणीयता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पालनपोषण | | | | | ०.०५ | ०.०१ | | | |
| १ | (उपक्रमपूर्व) मुलगे व मुली | १०० | २०.६८ | ३.५५ | १९८ | १.९७ | २.६० | १५. ६०७ | ०.०१ स्तरापेक्षा जास्त | ०.०१ स्तरावर लक्षणीयता आहे |
| | (उपक्रमोत्तर) मुलगे व मुली | १०० | २९.७१ | ४.५७ | | | | | | |
| | शिक्षण | | | | | | | | | |
| २ | (उपक्रमपूर्व) मुलगे व मुली | १०० | २९.५० | ४.१४ | १९८ | १.९७ | २.६० | १०.२५९ | ०.०१ स्तरापेक्षा जास्त | ०.०१ स्तरावर लक्षणीयता आहे |
| | (उपक्रमोत्तर) मुलगे व मुली | १०० | ३४.९४ | ३.०९ | | | | | | |
| | विवाह | | | | | | | | | |
| ३ | (उपक्रमपूर्व) मुलगे व मुली | १०० | २१.१७ | ३.३५ | १९८ | १.९७ | २.६० | १६.३४७ | ०.०१ स्तरापेक्षा जास्त | ०.०१ स्तरावर लक्षणीयता आहे |
| | (उपक्रमोत्तर) मुलगे व मुली | १०० | २९.८१ | ४.०९ | | | | | | |
| | स्वातंत्र्य | | | | | | | | | |
| ४ | (उपक्रमपूर्व) मुलगे व मुली | १०० | २३.८१ | ३.७५ | १९८ | १.९७ | २.६० | १४.५९८ | ०.०१ स्तरापेक्षा | ०.०१ स्तरावर |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (उपक्रमोत्तर) मुलगे व मुली | १०० | ३१.३९ | ४.१६ | | | | जास्त | लक्षणीयता आहे |
| | | | | | | | | | |

माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांची वरील घटकांच्या बाबतीतील फरकांच्या प्राप्तांकाचे 'टी मूल्य' अनुक्रमे १५.६०७ (०.०१ स्तरापेक्षा जास्त), १०.२५९, (०.०१ स्तरापेक्षा जास्त), १६.३४७ (०.०१ स्तरापेक्षा जास्त), १४.५९८ (०.०१ स्तरापेक्षा जास्त), १५.८३७ (०.०१स्तरापेक्षा जास्त), म्हणजेच माध्यमिक स्तरावरील मुलगे–मुली यांच्या पालनपोषण, शिक्षण, विवाह, स्वातंत्र्य,या घटकासंदर्भातील लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये लक्षणीय फरक आढळतो.

**निष्कर्ष:** मुलगे व मुली यांच्या पालनपोषण, शिक्षण, विवाह, स्वातंत्र्य, संदर्भातील लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमपूर्व व उपक्रमानंतर लक्षणीय फरक आढळतो.

मुलग्यांच्या व मुलींच्या पालनपोषण, शिक्षण, विवाह, स्वातंत्र्य,यासंदर्भातील लिंगविषयक अभिवृत्ती उपक्रमपूर्वीपेक्षा उपक्रमानंतर अधिक सकारात्मक झालेल्या आढळतात.

३ **परिकल्पना:** माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमानंतर पुढील घटकांच्या संदर्भात लक्षणीय फरक नाही.

अ) पालनपोषण, आ) शिक्षण, इ) विवाह, इ) स्वातंत्र्य

**सारणी क्र.३ माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमानंतर पुढील घटकांच्या संदर्भातील फरकाच्या प्राप्तांकांची लक्षणीयता**

| अ. क्र. | विद्यार्थी गट | नमूना | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | 'टी' सारणी मूल्य | | प्राप्त टी | सार्थकता | लक्षणीयता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पालनपोषण | | | | | ०.०५ | ०.०१ | | | |
| १ | (उपक्रमानंतर) मुलगे | ५३ | ७.९४ | ५.८९ | ९८ | १.९८ | २.६३ | २.२९६ | ०.०५ स्तरापेक्षा जास्त | ०.०५ स्तरावर लक्षणीयता आहे |
| | (उपक्रमानंतर) मुली | ४७ | १०.२६ | ३.८१ | | | | | | |
| | शिक्षण | | | | | | | | | |
| २ | (उपक्रमानंतर) | ५३ | ५.६२ | ५.०४ | ९८ | [illegible] | [illegible] | ०.३७९ | ०.०५ | लक्षणीयता |

विद्या वामन शिर्के डॉ. जयश्री शिंदे

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुलगे | | | | | | | | स्तरापेक्षा कमी | नाही |
| | (उपक्रमानंतर) मुली | ४७ | ५.२३ | ५.२ | | | | | | |
| | विवाह | | | | | | | | | |
| ३ | (उपक्रमानंतर) मुलगे | ५३ | ७.४२ | ५.५९ | ९८ | १.९८ | २.६३ | १.८१६ | ०.०५ स्तरापेक्षा कमी | लक्षणीयता नाही |
| | (उपक्रमानंतर) मुली | ४७ | ९.२८ | ४.३७ | | | | | | |
| | स्वातंत्र्य | | | | | | | | | |
| ४ | (उपक्रमानंतर) मुलगे | ५३ | ७.५७ | ५.८९ | ९८ | १.९८ | २.६३ | २.०९३ | ०.०५ स्तरापेक्षा जास्त | ०.०५ स्तरावर लक्षणीयता आहे |
| | (उपक्रमानंतर) मुली | ४७ | ९.८१ | ४.७८ | | | | | | |

माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या उपक्रमानंतरच्या लिंगविषयक सकारात्मक अभिवृत्तीच्या पालनपोषण या घटकासंदर्भातील फरकाच्या प्राप्तांकाच 'टी' मूल्य २.२९६ (०.०५ स्तरापेक्षा जास्त), ०.३७९ (०.०५ स्तरापेक्षा कमी), १.१८६ (०.०५ स्तरापेक्षा कमी), २.०९३ (०.०५ स्तरापेक्षा जास्त), ०.३९७ (०.०५ स्तरापेक्षा कमी) असे आहेत. यावरून मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमानंतर पालनपोषण व स्वातंत्र्य या घटकांमध्ये लक्षणीय फरक आढळतो. तर शिक्षण, विवाह, याघटकांमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

**निष्कर्षः** मुलगे व मुली यांच्या पालनपोषण व स्वातंत्र्य याघटकासंदर्भात लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमानंतर लक्षणीय फरक आढळतो. पालनपोषण व स्वातंत्र्य याघटकासंदर्भातील लिंगविषयक अभिवृत्ती मुलग्यांपेक्षा मुलीच्या अधिक प्रमाणात सकारात्मक झालेल्या आढळतात. तर मुलगे व मुली यांच्या शिक्षण, विवाह, हक्क व काम याघटकांसंदर्भातील लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये लक्षणीय फरक आढळत नाही.

४ **परिकल्पनाः** माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये, लिंगविषयक सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमाच्यानंतर लक्षणीय फरक नाही.

**सारणी क्र.४ माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये, लिंगविषयक सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमाच्यानंतर फरकाच्या प्राप्तांकाची लक्षणीयता**

| अ. क्र. | विद्यार्थी गट | नमूना | मध्यमान | प्रमाण विचलन | स्वाधीनता मात्रा | 'टी' सारणी मूल्य | | प्राप्त टी | सार्थकता | लक्षणीयता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | ०.०५ | ०.०१ | | | |
| | (उपक्रमनंतर) मुलगे | ५३ | ३७.०६ | १५.९२ | ९८ | १.९८८ | २.६८ | १.८७१ | ०.०५ स्तरापेक्षा कमी | लक्षणीयता नाही |
| | (उपक्रमनंतर) मुली | ४७ | ४२.४ | १२.१२ | | | | | | |

माध्यमिक स्तरावरील मुलगे व मुलींच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमाच्यानंतर फरकाच्या प्राप्तांकाचे 'टी' मूल्य १.८७१ हे ०.०५ स्तरावरील सारणी मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणजेच मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित केलेल्या उपक्रमानंतर लक्षणीय फरक आढळत नाही.

**निष्कर्ष:** मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्ती या सकारात्मक अभिवृत्तीसाठी विकसित उपक्रमानंतर सारख्याच प्रमाणात सकारात्मक झालेल्या आढळतात

**संशोधनाचे एकत्रित निष्कर्ष:**

- मुलगे व मुली यांच्या एकत्रितपणे उपक्रमपूर्व उपक्रमानंतरच्या लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये फरक आढळतो. मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्ती उपक्रमानंतर अधिक सकारात्मक झालेल्या आढळतात.
- मुलगे व मुली यांच्या एकत्रितपणे पालनपोषण शिक्षण, विवाह, स्वातंत्र्य,या घटकासंदर्भातील लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमपूर्व व उपक्रमानंतर लक्षणीय फरक आढळतो.

मुलगे व मुली यांच्या एकत्रितपणे पालनपोषण शिक्षण, विवाह, स्वातंत्र्य, या घटकासंदर्भातील लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमानंतर सकारात्मक परिणाम झालेला आढळतो.

- मुलगे व मुली यांच्या पालनपोषण, शिक्षण या घटकासंदर्भातील लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमानंतर फरक आढळतो.
  मुलगे व मुली यांच्या लिंगविषयक अभिवृत्ती या उपक्रमानंतर पालनपोषण व शिक्षणासंदर्भात सारख्याच सकारात्मक झालेल्या आढळतात.

- मुलगे व मुली यांच्या विवाह, स्वातंत्र्य या घटकासंदर्भातील लिंगविषयक अभिवृत्तीमध्ये उपक्रमानंतर फरक आढळतो

## संदर्भ:

अनोमवीर (२०१५), बुध्दयान, त्रिरत्न प्रकाशन पुणे ३०.

भागवत, वि. (२००४), स्वातंत्र्यपूर्व काळातील लोकजीवन नित्य नूतन प्रकाशन, पुणे ३०.

नरे, सं. (२०१२), तिची भाकरी कोणी चोरली?, बहुजन स्त्रीचं वर्तमान, मनोविकास प्रकाशन, पुणे ३०.

रेगे, श. (२०११) लिंगभेद कारणे, SNDT Women's Study Center पुणे ३०.

सामंत, मं. (२००९), स्त्री पर्व, निराली प्रकाशन, मुंबई ०४.

Amin, A., & Darrag, M. S. (2011). Sexual Harassment in the Egyptian Workplace: A Literature Review and Research Agenda. *Review of Management*, *1*(4).

https://www.questia.com/.../sexual-harassment-in-the-egyptian-workplace-a-litera

Chouhan, P. (2013). A study on literacy and educational attainment of scheduled castes population in Maldah District of West Bengal, India. *Journal of geography and Regional Planning*, *6*(1), 19-30.

www.academicjournals.org/app/webroot/article/article1381475667_Chouhan.pdf

Ekici, D., & Beder, A. (2014). The effects of workplace bullying on physicians and nurses. *Australian Journal of Advanced Nursing, The*, *31*(4), 24. http://www.ajan.com.au/Vol31/Issue4/31-4.pdf

Kapure R. (2015) Maritual Satisfaciton in late marriage and early marriage. Personality factors marital satisfaction and perceived level of career success in late married individuals and early married individuals http://hd1.handle.net/10603/203968

Kumari, R. (2011). Womens right to property under Hindu Law A socio legal study. http://hd1.handle.net/10603/7870

Lind, A. M. (2007). Struggle and development: Approaching gender bias in practical international development work. .https://scholar.google.co.in/scholar?rlz=1C1CHBF_enIN765IN765&um=1&ie=UTF-8&lr&q=related:sMdCWARVMjPF-M:scholar.google.com/